विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालयात नियुक्त कंत्राटी विधी अधिकारी यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक:- संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१०७/ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १५ सप्टेंबर, २०१७

संदर्भ :-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.ईएसटी- २०१०/प्र.क्र.४२/ई-८, दिनांक ०६ एप्रिल, २०११,
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.ईएसटी- २०१०/प्र.क्र.४२/ई-८, दिनांक ३० जुलै, २०११,
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.ईएसटी- २०१३/प्र.क्र.१७३/ई-८, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१३,

प्रस्तावना :-

विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावरील सर्व न्यायालयीन प्रकरणांत परिच्छेदनिहाय अहवाल तयार करणे, शपथपत्र तयार करणे, तसेच न्यायालयीन प्रकरणांचा पाठपुरावा करून शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी शासकीय वकीलांना सहाय्य करणे इत्यादी कामांकरिता राज्यातील ६ विभागीय आयुक्त व ३५ जिल्हाधिकारी कार्यालयात (पालघर वगळता) प्रत्येकी एक याप्रमाणे ४१ विधी अधिकारी यांची पदे कंत्राटी पध्दतीने संदर्भाधीन क्र. १ व ३ मधील दिनांक ०६ एप्रिल, २०११ व दिनांक १४ नोव्हेंबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आलेली आहेत. या कंत्राटी विधी अधिकाऱ्यांना दरमहा मानधन रू.२०,०००/- व दुरध्वनी व प्रवासखर्च रू.५,०००/- इतकी ठोक रक्कम अदा करण्यात येते. या मानधनाच्या रकमेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

राज्यातील ६ विभागीय आयुक्त व ३५ जिल्हाधिकारी कार्यालये येथे कार्यरत असणाऱ्या प्रत्येकी एक याप्रमाणे ४१ कंत्राटी विधी अधिकारी यांना देण्यात येणाऱ्या दरमहा मानधन रु. २०,०००/- मध्ये

वाढ करुन दरमहा मानधन रू.३०,०००/- आणि दुरध्वनी व प्रवास खर्च रू.५,०००/- अशी एकूण रू.३५,०००/- ठोक रक्कम शासन निर्णयाच्या दिनांकापासून अदा करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयातील कंत्राटी विधी अधिकाऱ्यांना अदा करावयाच्या मानधन, दुरध्वनी व प्रवासखर्चापोटी ठोक रकमेचा खर्च "मागणी क्र.सी-१- २०५३ जिल्हा प्रशासन (००) १०१ आयुक्त" या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील कंत्राटी विधी अधिकाऱ्यांना अदा करावयाच्या मानधन, दुरध्वनी व प्रवासखर्चापोटी ठोक रकमेचा खर्च "मागणी क्र.सी-१- २०५३ जिल्हा प्रशासन ०९३ (०१) सर्वसाधारण आस्थापना" या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, अनौपचारीक संदर्भ क्र.२६४/२०१६/व्यय-९, दिनांक २८/०७/२०१७, अन्वये दिलेल्या सहमतीनुसार व मंत्रिमंडळाने दि.२३ ऑगस्ट, २०१७ च्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेताक २०१७०९१५१२१५१२९४१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Nilkanth Pandurang Awhad

Digitally signed by Nilkanth Pandurang Awhad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e42a88b7548c3a7d48b7a77d85de3524cf8f2e7e0f87091223ad803d4d4a2a31, cn=Nilkanth Pandurang Awhad
Date: 2017.09.15 12:12:46 +05'30'

(नि. पां. आव्हाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

६) प्रधान महालेखापाल- १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.

७) विभागीय आयुक्त (सर्व).

८) जिल्हाधिकारी (सर्व).

९) सह सचिव/उप सचिव, (सर्व) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.

१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

११) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.

१२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

१३) वित्त विभाग, कार्यासन व्यय-९/वित्तीय सुधारणा- १/अर्थसंकल्प- ६, मंत्रालय, मुंबई-३२.

१४) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.

१५) विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.

१६) कार्यासन अधिकारी/ब-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.

१७) निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.